ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भरतकला एक रोजगाराची संधी

**प्रा.डॉ. पुनम चौधरी (देशमुख)**
इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय
अमरावती

भरतकला ही प्राचीन अशी कला आहे. फार पूर्वी जेव्हा कापड हाताने केले जायचे, त्यावेळेस देखील उपलब्ध साधनसामग्रीला उपयोग करुन कापडावर सजावट केली जात असे. संपूर्ण जगात विविध संस्कृतीनुसार कपड्यांच्या सजावटीच्या विविध पध्दती व तंत्रे विकसीत झालीत व आज भरतकला ही विविध फॅशन व शैलीने समृध्द अशी कला झाली आहे. भरतकलेचा उपयोग शेकडों वर्षापासून वैयक्तिक कपडे, घरगुती कपडे व घरगुती वस्तूंचे सौंदर्य वाढविण्याकरीता केला जातो. स्त्रियांना विविध हस्तकला आवडतात. किंबहुना एखादी कला अवगत असणे हे मानाचे व संस्कृतीचे लक्षण समजले जाते. स्त्रियांच्या आवडीच्या विषयात भरतकलेला प्रथम स्थान आहे. विविध कलांमध्ये सर्वाधिक प्रिय व सर्वसामान्यापर्यंत पोहोचलेली कला म्हणजे भरतकला होय. भरतकला म्हणजे मानवी कल्पना व सौंदर्य यांची अभिव्यक्ती होय. धागे, कापड, सुई नमुने या विविध माध्यमांचे संघटन करुन त्याची उपयोगिता, अनंद देणारी कल्पना व कौशल्याची अभिव्यक्ती म्हणजे भरतकला.

भरतकला ही जरी कला असली तरी ती बहुतेक कलाकुसर या अंतर्गत येते. संगीत, चित्र, नृत्य इत्यादी कलांप्रमाणे या कलेमध्ये भावनाविष्कार हा मुख्य उद्देश्य नसुन सजावट हा मुख्य उद्देश्य असतो. या कलेची योजना, सजावट व उपयुक्तता या दृष्टीनेच केली जाते. दैनंदिन गृहकृत्ये सांभाळून फावल्या वेळेचा सदुपयोग करुन वैयक्तिक कपड्यांची सजावट करणे व घराचे सौंदर्य वाढवणे हा स्त्रियांचा फार पूर्वीपासून आवडता छंद होता व या छंदातूनच भरतकलेचा उगम झाला. भरतकलेमधून विद्यार्थीनींना रोजगारनिर्मितीची नवी दिशा प्राप्त होते. विद्यार्थीनी किंवा महिलांना स्वतःकरिता आर्थिक पाठबळ निर्माण होते. आजच्या स्पर्धेच्या युगात सर्वांनाच नोकरी मिळेल असे नाही तर त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरीता, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी त्यांना भरतकला ही महत्वाची कला आहे. भरतकलेच्या माध्यमातून विविध महिलांना रोजगार निर्मिती उपलब्ध करुन दिली जाते.

**उद्दिष्टे :–**

1. रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून भरतकलेचे महत्व पटवून देणे.
2. महिला उद्योजकतेचा अभ्यास करणे.

**गृहितक :–**

1. रोजगाराच्या दृष्टीने भरतकला साहय्यभूत ठरते.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत संशोधन अमरावती शहरा पुरते मर्यादित असून यामध्ये प्रश्नावली व निरिक्षण अनुसूची पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**नमुना निवड :–**

प्रस्तुत अध्ययनामध्ये अमरावती शहरातील 100 महिलांची यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आली आहे.

**परिणाम व चर्चा :–**

महिलांच्या माध्यमातून प्राप्त माहितीची मांडणी अध्ययनाच्या उद्दीष्टांना अनुसरुन करण्यात आली आहे. भरतकला महिलांकरिता स्वयंरोजगाराची संधी आहे. या करीता महिलांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण खालील सारणीत करण्यात आले आहे.

| अ.क्र. | विवरण | होय (टक्के) | नाही (टक्के) |
|---|---|---|---|
| 1. | तुम्हास भरतकला आवडते. | 95 (95) | 5 (5) |
| 2. | तुम्हास भरतकलेमधून आनंद मिळतो. | 95 (95) | 5 (5) |
| 3. | तुम्हास भरतकलेमधून विविध कलागुणांना वाव मिळतो | 90 (90) | 10 (10) |
| 4. | तुम्हास भरतकलेपासून अर्थाजन होण्यास मदत होते | 85 (85) | 15 (15) |
| 5. | तुम्हास रोजगार निर्मितीच्या दृष्टीने भरतकला उपयोगी वाटते | 90 (90) | 10 (10) |
| 6. | तुमचा भरतकामामध्ये वेळ चांगला जातो | 95 (95) | 5 (5) |

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | भरतकलेमुळे तुमचा आत्मविश्वास निर्माण होऊन समाजात प्रतिष्ठा वाढते. | 90 (90) | 10 (10) |
| 8. | या माध्यमातून तुम्हास रोजगार उपलब्ध होतो. | 95 (95) | 5 (5) |
| 9. | भरतकलेच्या माध्यमातून तुम्हास तुमच्या मुलांच्या गरजा भागविण्यास मदत होते. | 85 (85) | 15 (15) |
| 10. | भरतकलेच्या माध्यमातून महिला सबलीकरण होण्यास मदत होते. | 80 (80) | 20 (20) |

- **कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.**

वरील सारणी वरुन प्राप्त माहिती विवेचनात्मक पध्दतीने खालील प्रमाणे मांडण्यात आली. 95 टक्के महिलांना भरतकला आवडते तर फक्त 5 टक्के महिलांना भरतकला आवडत नसल्याचे दिसून आले. 95 टक्के महिलांना भरतकलेमध्ये आनंद मिळतो तर 5 टक्के महिलांना भरतकलेतून आनंद मिळत नसल्याचे निदर्शनास आले. 90 टक्के महिलांच्या कलागुणांना भरतकलेमधून वाव मिळतो तर 10 टक्के महिलांच्या कलागुणांना वाव मिळत नाही. 85 टक्के महिलांना भरतकलेपासून अर्थाजन होण्यास मदत होते तर 15 टक्के महिलांना भरतकलेपासून अर्थाजन होण्यास मदत होत नाही असे आढळते यावरुन त्यांनी त्यादृष्टीने प्रयत्न केले नसतील किंवा त्यांचा सामाजिक सहभाग हा कमी असू शकतो. 90 टक्के महिलांना रोजगाराच्या दृष्टीने भरतकला उपयुक्त वाटते तर 10 टक्के महिलांना रोजगाराच्या दृष्टीने भरतकला उपयुक्त वाटत नसल्याचे दिसून आले. 95 टक्के महिलांनी भरतकलामुळे वेळ चांगला जातो तर 5 टक्के महिलांचा भरतकलेमुळे वेळ चांगला जात नसल्याचे आढळून आले. यावरुन 95 टक्के महिलांनी आपल्या फावल्यावेळेचा उपयोग भरतकलेतून रोजगार निर्मिती करीता केल्याचे निदर्शनास आले. 90 टक्के महिलांची भरतकलेमुळे आत्मविश्वास निर्माण होऊन समाजात प्रतिष्ठा वाढल्याचे दिसून आले. याचाच अर्थ या महिलांना आत्मनिर्भर होण्यासाठी भरतकला हे एक साधन बनल्याचे दिसून येते. 95 टक्के महिला भरतकलेच्या माध्यमातून रोजगार मिळत असल्याचे निदर्शनास आले. यावरुन या महिला सखवंत, कुणालाशोक, आवड म्हणून भरतकलेच्या साड्या, चादरी, टेबलक्लाथ, रुमाल इत्यादि करुन रोजगार करतांना दिसून आल्या. 85 टक्के महिलांना भरतकलेच्या माध्यमातून मुलांच्या गरजा भागविण्यास मदत होत असल्याचे दिसून येते तर 15 टक्के महिला भरतकलेच्या माध्यमातून मुलांच्या गरजा भागविण्यात मदत होत नसल्याचे आढळून आले. 80 टक्के महिला भरतकलेच्या माध्यमातून महिला सबलीकरण होण्यास मदत होते असल्याचे आढळून आले. यावरुन महिला सबलीकरण म्हणजे फक्त अर्थाजन करणे नव्हे तर त्या आत्मनिर्भर बणने, सामाजिक दर्जा उपलब्ध होणे हे या भरतकलेच्या माध्यमातून होणे शक्य झाल्याचे दिसून आले.

**निष्कर्ष :–**

भरतकला ही महिलांना आत्मनिर्भर, स्वयंरोजगार, महिला सबलीकरण तसेच त्यांचा समाजिक, आर्थिक, कौटूंबिक दर्जा व प्रतिष्ठा वाढविण्यासाठी एक प्रभावी माध्यम असल्याचे दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची :–**

1. *डा. उज्वला वैरागडे, प्रा. अन्विता अग्रवाल (2017) वस्त्रशास्त्राची संकल्पना व फॅशन डिझाइनिंग.*
2. *योजना मासिक (2016)*